# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र./३२/पी.आर

दिनांक :-१०/०६/२०२४

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिका अंतर्गत कर्मचाऱ्यांची ७व्या वेतन आयोगानुसार १०,२०,३० वर्ष पूर्ण झाल्यानंतर आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येत असतो. सदर योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेले लाभाची वेतननिश्चिती सुद्धा वित्त विभागातील पथकाकडून करून घेण्यात येते व वित्त विषयक बाबीवर संबंधीत अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी अभिमत घेण्यात येते. विभागाने केलेली वेतननिश्चिती अचूक व बरोबर असल्याची खात्री व तपासणी करणे इत्यादी कामासाठी खालीलप्रमाणे अनुभव असलेल्या वित्त विभागा अंतर्गत **"कंत्राटी लेखा सल्लागार"** या पदावर कंत्राटी/करार तत्वावर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ व सुधारित शासन निर्णय दि. ०८/०९/२०२३ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

त्याकरिता पात्र सेवानिवृत्त इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.२६/०६/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता, अति. आयुक्त (शहर), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | **A- कंत्राटी लेखा सल्लागार**<br>(देयक आणि इतर वित्त विषयक बाबी पडताळणी व विशिष्ट प्रकरणी तपासणी करून अभिप्राय नोंदविणे करीता) | ०१ | कमाल ६५ वर्षे | महाराष्ट्र शासन, लेखा व वित्त सेवेतील इतर शासकीय सेवेतील **"लेखाधिकारी"** या पदावरून सेवानिवृत्त झालेले गट-ब संवर्गातील वेतनमान रू. (७ वे वेतन आयोगानुसार ४४९००-१४२४००) व त्याहून अधिक असलेले व प्रस्तावित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव |
| २ | **B -कंत्राटी लेखा सल्लागार**<br>(सेवानिवृत्ती प्रकरणे तपासणी करून अतिरिक्त प्रदानाचा शोध घेणे तसेच महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षण पथकाने घेतलेल्या आक्षेपाचे निराकरण करणे करिता) | ०१ | | |

वरील पदाकरिता इच्छूक उमेदवारांनी दि.२६/०६/२०२४ रोजी **सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान** आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त (शहर), नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

Scanned with OKEN Scanner

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि.२६/ ०६/२०२४ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडाव्यात.

५. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **लेखा व वित्त विभागाच्या आस्थापनेवरून काढण्यात येईल.**

६. उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय/स्थानकि स्वराज्य संस्था या सारख्या संस्थेतून सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेल्या मुळ निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रक्कमे ऐवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे, आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/- डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२४



Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

१. पदाचे नाव :- ..............................

२. अर्जदाराचे नांव :- ..............................

३. पूर्ण पत्ता :- ..............................

..............................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..............................

ई-मेल आय डी :- ..............................

४. जन्म दिनांक :- ..............................

५. दि. / /२०२४ ला वय :- ..............................

६. उमेदवारांचे जात व जातीचा संवर्ग :- ..............................

७. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व कार्यालय :- ..............................

८. शैक्षणिक पात्रता :- ..............................

९. अ) सेवाकाळातील विभागीय चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदारा विरुध्द कोणताही गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील ..............................

९. अनुभवाचा तपशील :- ..............................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी